# गड किल्ले

## साम्राज्य शिवरायांचे

दत्तात्रय कृष्णा निकम



**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# गड किल्ले... साम्राज्य शिवरायांचे

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

## पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# गड किल्ले... साम्राज्य शिवरायांचे

लेखक : दत्तात्रय कृष्णा निकम

# गड किल्ले... साम्राज्य शिवरायांचे


## लेखक - दत्तात्रय कृष्णा निकम

अ / ४०४, चंदन , मैत्री  वाटिका , पारसिकनगर,जुना  मुंबई  पुणे  रोड, कळवा, ठाणे - ४००६०५

मोबाईल / व्हाट्सअँप: ९८१९१६६८१५

ई-मेल : dkn28379@gmail.com


**विशेष आभार : इतिहास महाराष्ट्राचा - गड किल्ल्याचा - (यांच्या यु-ट्युब व्हिडिओ आपण ई -बुक संकल्पनेसाठी वापरले आहेत).**

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते (दंड व तुरुंगवास).**

**This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
esahity@gmail.com
प्रकाशन : २६ ऑगस्ट २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय

मी, दत्तात्रय कृष्णा निकम, मूळचा सातारा जिल्ह्यातील तालुका खटाव रहाटणी गावाचा, कामानिमित्त मी मुंबईत माझ्या कुटुंबासोबत पारसिकनगर कळवा (ठाणे) येथे वास्तवास आहे. मी स्वतः इंस्ट्रुमेंटेशन



इंजिनिअर असून एका प्रायव्हेट कंपनीत ऑईल अँड गॅस डिजाईन सेंटर मध्ये मुख्य अभियंता (Chief Engineer- Instrumentation) म्हणून कार्यरत आहे.

मला स्वतःला वाचन , लेखन , क्रिकेट खेळणे, समाजसेवा यात प्रामुख्याने रस आहे. मला वाचनाची आवड आहे व मी माझ्या आयुष्यात लेखनाचे काम सुद्धा केले आहे, त्यात प्रामुख्याने मराठी विषयांवर लिखाण केले आहे. मला माझ्या वाचनाच्या आवडीने मराठी, हिंदी व इग्रंजी साहित्य, वेग-वेगळ्या प्रकारचे लेख, कथा, आत्मचरित्र वाचण्याच्या संधी मिळाल्या. त्यात माझी आवड प्रामुख्याने मराठी साहित्य, विविध मराठी साहित्यिक वाचायला मिळाले. माझ्या वाचनाची सुरुवात श्री. पु. ल. देशपांडे,

श्री.मंगेश पाडगांवकर, श्री. प्र. के. अत्रे. आणि अश्या बऱ्याच मान्यवरांच्या लेखनाने झाली. मी आतापर्यंत वाचलेल्या पैकी बटाट्याची चाळ, तो मी नव्हेच असो किंवा मग सांगा आता कसे जगायचे खुपच प्रभावित करून गेले.

मी लिहिलेल्या माझ्या कविता - **मन**, **नाद-खोडकर बंड्या**, **सांगा आता कसे जगायचे** ? आधारित संकल्पना, चारोळ्या, लेख - **भारत एक्सप्रेस**, विचार, प्रवास वर्णन असे साहित्य मी सिंगापुर ला असताना महाराष्ट्र मंडळ, सिंगापूरच्या विविध मराठी कार्यक्रमात – **शब्दगंधा** असो किंवा मग **ऋतुगंध त्रैमासिक** किंवा मग **गणेशोस्तव स्मरणिका** मध्ये मी मराठी ...दत्तात्रय कृष्णा निकम या नावाने प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच माझे स्वतःचे विचार मांडण्यासाठी मी सुरु केलेला माझा मराठी ब्लॉग इंडिअन प्राऊड.....भारतीयांचा अभिमान (https://indianproud.blogspot.in) परंतु थोडे वर्ष हा ब्लॉग बंद होता कारण तेव्हा मी माझ्या एका अभियांत्रिकी विषयाच्या पुस्तकावर काम करीत होतो. " Fundamentals of Project planning and Engineering" for final year Instrumentation Engineering च्या विद्यार्थ्यांसाठी जून -२०१७

महिन्यात प्रकाशित झाले. हे पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या इंस्ट्रुमेंटेशन इंजिनीरिंग च्या आठव्या सेमिस्टर मध्ये वापरले जाणार आहे.

अशा अनेक संधी मिळाल्या माझ्या वाचनाच्या आणि लेखनाच्या छंद जपण्याच्या. तसेच मला आपण वाचकांनी दिलेला प्रतिसाद, अभिप्राय नविन - नविन विषयांवर लेखन करण्यासाठी नेहमीच प्रवृत्त करतात.

# अर्पण पत्रिका

## प्रौढ़ प्रताप पुरंदर, क्षत्रिय कुलावतंस, सिंहासनाधिश्वर, महाराजाधिराज, शिव छत्रपती श्री शिवाजी महाराजांना मानाचा त्रिवार मुजरा !!!...



**महाराजांचे विचार, त्यांचे कर्तृत्व आणि आचरण या वर श्रध्दा असणाऱ्या असंख्य जन माणसातील मावळ्यांना अर्पण**

# मनोगत

**प्रिय वाचकहो,**

नमस्कार ! आपणास माझे विचार तुमच्या बरोबर सादर करण्याची संधी ई-साहित्यच्या "**ई -बुक**" संकल्पनेतून मिळाली, त्याबद्दल ई -साहित्यचे मनापासून आभार. अशा संधी प्रत्येकास देत आहात आणि देत रहा, कदाचित त्यामुळे मराठी साहित्यास नविन लेखक आणि नविन विषय मिळतील अशी आशा करतो.

राजाचे विचार सगळ्यांनाच माहीत असतील, पण ते विचार सत्यात उतरविणे कदाचित अवघड वाटत असतील पण सुरूवात करायला काय हरकत आहे. मी स्वतः या विषयात विद्वान नाही पण राजासाठी काही तरी करण्याचा एक प्रयत्न म्हणून हा विषय निवडला आहे.

आता कसे झाले ! आज इंटरनेटप्रणाली मुळे सर्व जग जणू आपल्या हातात आले आहे. हे हवे वापर गुगल, त्याची माहिती हवी वापर गुगल, यातून प्रत्येक्षात भेटणे, माहिती गोळा करणे पूर्णपणे बंद झाले असे म्हणता येणार नाही पण याचे प्रमाण नक्कीच कमी झाले आहे, असे मला वाटते, तुम्हाला नक्की  काय वाटते ? जरूर कळवा.

तांत्रिक प्रगति महत्वाची आहे, पण नैसर्गिकरित्या मिळणार आनंद वेगळाच आहे हे मी काही वेगळे सांगण्याची गरज नाही. *असेच काही आहे आपल्या महाराज्यांच्या बाबतीत आपण त्यांना पाहु शकलो नाही, थोडाफार इतिहास सगळ्यांनीच वाचला आहे, कदाचित शाळेत पर्याय नसल्यामुळे असू शकते. पण आजही महाराज्यांच्या विषयी चर्चा, त्यांच्यावरील गाणी, पोवाडे आणि चित्रफिती पाहिल्या की अंगात एक वेगळी ऊर्जा येते, तसेच आपल्या राजाची कर्तव्यदक्ष कामगिरी पाहून मनात वेगळा विश्वास निर्माण होतो.*

अशा या महान राजाच्या पराक्रमाची आठवण म्हणून आपण त्यांच्या गड किल्ले यांची माहिती घेऊन "ई-परिक्रमा" करण्याचा एक छोटासा प्रयत्न करूया आणि मला याची खात्री आहे की यात आपण माझ्यासोबत असाल.



ह्या विषयावर लेखन करताना, विविध प्रकारच्या चर्चा, स्वतः गड किल्यावर जाऊन दिलेल्या भेटी, इंटरनेटप्रणाली, वाचलेली पुस्तके आणि त्यातून मिळणारी माहिती संग्रहित करण्याचा हेतू एकच आहे असे काही साहित्य असावे, ज्यामुळे या सर्वांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. हा विषय सादर करताना **ई-**

**बुक** संकल्पना वापरणार आहोत. ह्यात प्रामुख्याने गडाची माहिती आणि त्याविषयाची यु-ट्यूब व्हिडिओ लिंक सोबत जोडणार आहोत.

**विशेष सूचना: आजवर अनेक मान्यवर लेखकांनी, साहित्यिकांनी, किल्ले गिर्यारोहकांनी, मावळ्यांनी स्वतः प्रयत्न करून विविधांगी लिहिलेले साहित्य, चित्रपट, यु-ट्यूब चॅनेल / व्हिडिओ बनविलेले आहेत, त्यांना सुद्धा सादर प्रणाम आणि त्यांच्या यु ट्यूब व्हिडिओ लिंक वापरत आहे. ह्या यु-ट्यूब व्हिडिओचा वापर कोणत्याही प्रकारच्या कमर्शियल वापरासाठी वापर केला जाणार नाही याची खात्री देऊन मूळ विषयास आपण सुरुवात करणार आहोत.**

या विषयावर असलेले प्रेम, जिज्ञासू वृत्ती आणि मग त्यातुन आम्ही स्वतः तयार केलेले थोडेफार साहित्य तुम्हाला खालील लिंक वर पाहता येईल, जर तुम्हाला आमचा (**शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मुव्हीज**) टीमचा प्रयत्न आवडला तर व्हिडिओला जरूर LIKE करा आणि चॅनेल ला SUBSCRIBE करायला विसरू नका.

- **माझ्या राजा रे**

https://youtu.be/35xtarD8SVY

- **प्रवास आयुष्याचा एक अनुभूती**

  https://youtu.be/pb9IeybU2_E

- **सातारा डायरी : किल्ले भूषणगड ! Satara Diary - Fort Bhushangad**

  https://youtu.be/cH5StVIzqDg

जर आपणांस हा विषय ‘ **गड-किल्ले … साम्राज्य शिवरायांचे** ’ आवडला किंवा ह्या बद्दल काही अभिप्राय द्यायचा असल्यास आम्हाला जरूर लिहा. आपले अभिप्राय आम्हाला अति उत्कृष्ठ साहित्य किंवा मग नविन विषय सादर करण्याची प्रेरणा देतात. आयुष्यात  काहीतरी नविन करण्याची प्रेरणा मला लहानपणापासून विविध प्रकारचे छंद जपणे, कला आत्मसात करणे हे खूप फायदेशीर होते ते आज मला जाणवले आहे.

**धन्यवाद !**

आपला,

दत्तात्रय कृष्णा निकम, मी मराठी


“शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मुव्हीज टीम”
सुयोग थळी (लोकेशन प्रमुख)
मल्लप्पा सज्जन (सहाय्यक मार्गदर्शक)
दत्तात्रय निकम (निर्माता ,दिग्दर्शक)
संजय कटंबळे (लोकेशन स्क्रीनिंग)
किरण लाड (साऊंड एडिटिंग व रेकॉर्डिंग)
पंकज घावरे (प्रमुख कॅमेरामन)

# अनुक्रमणिका


**१. माझा राजा - छत्रपती शिवाजीराजे भोसले**

**२. गड किल्ले - एक साम्राज्य**

**३. गड किल्ले : एक ई – परिक्रमा**

**४. महाराजांची शस्त्रे**


*या पुस्तकातील अनेक चित्रांत व्हिडिओ लपलेले आहेत.*
*त्यातून त्या त्या किल्ल्याची इत्थंभुत परिक्रमा घडवलेली आहे.*

## १. माझा राजा - छत्रपती शिवाजीराजे भोसले

छत्रपती शिवाजीराजे भोसले, यांचा जन्म फेब्रुवारी १९, १६३० साली शिवनेरी गडावर झाला. मराठी साम्राज्याचे संस्थापक उत्कृष्ट योद्धा, आदर्श शासनकर्ता, सर्वसमावेशक, सहिष्णू राजा म्हणून भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्रीय इतिहासावर महत्त्वपूर्ण ठसा उमटवला.



**(सौजन्य: गुगल- शिवनेरी किल्ला)**

शिवनेरीचा हा प्राचीन किल्ला महाराष्ट्र राज्यात जुन्नर गावाजवळ, पुण्यापासून अंदाजे १०५ किलोमीटरवर आहे. हा किल्ला जिंकावयास कठीण असा बालेकिल्ला आहे, किल्याला चारही बाजूंनी कठीण चढाव असून शिवाई देवीचे छोटे मंदिर, जिजाबाई व बाल-शिवाजी यांच्या प्रतिमा आहेत. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा 'शिवजयंती' म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख 'शिवशंभू' असा होतो. जाणता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे निर्माते, महाराष्ट्रासह जगभरात ज्यांचे नाव आदराने घेतले जाते; ज्यांच्या साहस कथा, विचार, तत्त्वज्ञान आजही सर्वांना प्रेरणा देतात, अशा छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती म्हणजे एक पर्वणी असते.

सुसंस्कार, शिक्षण, युद्धशास्त्र, राजकारण, न्यायशास्त्र, प्रजाहितदक्ष राज्यकारभार यात राजे तरबेज झाले आणि आपले सहकारी, मर्द मावळे यांच्या साहाय्याने महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन केले. रायगडावर ६ जून इ.स. १६७४ रोजी छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा गागाभट्ट यांनी राज्याभिषेक केला. सोहळ्यासाठी ३२ मण सोन्याचे

सिंहासन बनवले गेले होते. शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून सुमारे ११००० ब्राह्मण आमंत्रित आणि इतर लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते.



राज्याभिषेकच्या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, प्रमुख ब्राह्मणांच्या पाया पडून, राज्याभिषेक सुरू झाला. यावेळी शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचावर महाराज बसले. आठ प्रधान नद्यांतून आणलेल्या पाण्याने शिवाजीमहाराजावर अभिषेक केला गेला.

यानंतर महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले, जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली आणि मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला. दालन ३२ शकुन चिन्हांनी सजवलेले होते.

शिवाजी महाराज ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर आरुढ झाले. सोळा सुवासिनींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. **शिवराज महाराज की जय! शिवराज महाराज की जय!** च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीची फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून आशीर्वाद दिला.

**शिवराज महाराज की जय ! शिवराज महाराज की जय !**



**(सौजन्यः गुगल- राज्याभिषेक सोहळा)**




**काय सांगते शिवरायांची राजमुद्रा ?**


मराठी अर्थ – प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी आणि विश्ववंदनीय असणारी अशी ही शहाजींचे पुत्र शिवाजी यांची (राज)मुद्रा (प्रजेच्या) कल्याणासाठी विराजमान होते.

## शिवगर्जना घोषणा म्हणजे नेमकं काय ? गारद म्हणजे काय ?

महाराज दरबारात प्रवेश करत असताना जी घोषणा किंवा ललकारी दिली जात होती तिला  मराठीत **गारद** असे म्हटले जाते.

गारदेला संस्कृतमध्ये **बिरुद** किंवा **बिरुदावली** तर ऊर्दु भाषेत **अल्काब** असे म्हणतात. महाराज्यांच्या दरबारात प्रवेश करत असताना जी घोषणा दिली जाते त्याला शिवगर्जना घोषणा म्हणतात.

आपण या सदरात शिवगर्जना अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.




**(<u>सौजन्य: गुगल- शिवगर्जना</u>)**

- **गडपती** – राज्यातील सर्व गडांवर ज्यांचे राज्य आहे असा तो राजा-महाराज.
- **गजअश्वपती** – ज्यांच्याकडे स्वतःच्या मालकीचे हत्ती व घोड्यांचे दल आहे असा महाराज.
- **भूपती प्रजापती** – राज्याभिषेक म्हणजे राज्यकर्त्याचा भुमीशी झालेला विवाह आहे. म्हणजेच ज्यांनी राज्यातील भुमीचे व प्रजेचा पती हे पद स्विकारले आहे आणि त्यांचे सर्वथा रक्षण करणे हे ज्या राज्यकर्त्यांचे प्रथम कर्तव्य आहे असा महाराज म्हणजेच भूपती प्रजापती.
- **सुवर्णरत्न श्रीपती** – राज्याच्या खजिन्यातील वेगवेगळे हिरे, माणिक, मोती आणि सोने यावर ज्यांची मालकी आहे असे महाराज. (शिवराय हे ३२ मण सुवर्ण सिंहासनाचे अधिपती होते.)
- **अष्टावधानजागृत** – आठ ही दिशांवर लक्ष असणारे जगाचे महाराज.
- **अष्टप्रधानवेष्टीत** – ज्यांच्या पदरी प्रत्येक शास्त्रात निपुण असलेले आठ प्रधान आहेत आणि राज्यकारभारात जे त्यांचा सल्ला घेणात असे महाराज.

- **न्यायालंकारमंडीत** – सत्याच्या व न्यायाच्या बाजुने निकाल देणारे महाराज.
- **शस्त्रास्त्रशास्त्रपारंगत** – सर्व प्रकारच्या शस्त्रविद्या पारंगत असलेले महाराज.
- **राजनितीधुरंधर** – आदर्श राज्यकर्त्या प्रमाणे राजकारणाच्या डावपेचांमध्ये तरबेज असलेले महाराज.
- **प्रौढप्रतापपुरंदर** – मोठे शौर्य गाजवुन ज्यांनी आपल्या पराक्रमाचा ठसा उमटवला असे महाराज.
- **क्षत्रियकुलावतंस** – क्षत्रिय कुळात जन्म घेऊन त्या कुळातील सर्वात मोठा पराक्रम गाजवलेले महाराज.
- **सिंहासनाधिश्वर** – जसा देव्हाऱ्यातील देव असतो तसेच ३२ मण सुवर्ण सिंहासनावर शोभुन दिसणारे सिंहासनाचे अधिश्वर असे महाराज.
- **महाराजाधिराज** – साऱ्या राजांनी ज्यांच्या अधिपत्याखाली राहण्याचे स्विकारायला हवे असे महाराज.
- **राजाशिवछत्रपती** – ज्यांच्यावर सुवर्णाची छत्रचामरे ढळत आहेत किंवा प्रजेने छत्र धरुन ज्यांना आपला अधिपती म्हणुन स्विकारले आहे किंवा ज्यांच्यावर प्रत्यक्षात नभानेच छत्र धरले आहे असे छत्रपती शिवाजी महाराज.



**(सौजन्य: गुगल - शिवरायांना मनाचा मुजरा)**

माझ्या राजाचा इतिहास इतका आहे की
तो आपण वाचू शकतो आचारु शकत नाही,
कोणी वाचला असेल तर तो शाळेत होता म्हणून
पण तेवढ्या पुरतेच असेच मला वाटते,
कारण आपण कधी...

स्वराज्यासाठी झटलोच नाही,
कधी उपाशी राहिलोच नाही,
कधी कोणाची गुलामगिरी केलीच नाही,
आपल्याला स्वराज शिवरायांनी दिले,
ह्याचा विचार कधी केलाच नाही,
आज मान ताठ करून चालतो आहे ,
हे कोणामुळे हे विसरलो आहे का ?
ज्यांच्या (शिवरायांचा) कृपेने हे दिवस पाहतोय,

त्यांनाच आपण विसरत चाललोय,
कधी कधी त्यांचे नावसुद्धा आपण एकेरी शिवाजी असे घेतो,
पण आपल्या बापाला आदराने बोलावतो,
बापाला आदराने बोलावतो गोष्ट चागली,
पण संस्कृती आपली नाही पाहिजे विसरली

पण कोणामुळे त्याच शिवरायांच्यामुळे ना !
अरे ! जर ते नसते तर आज तुम्ही आम्ही पण नसतो,
या जगात याचा कधी विचार केला आहे का ?.
नाही ना……

आपल्या डोक्यात काय आहे
आपल्या साठी स्वराज काय आहे,

आपण काही हि करू शकतो,
अरे ! कधी असा विचार केला का ?
त्यांनी आपल्यासाठी दिलेलं स्वराज
त्यासाठी सांडलेल पाण्या सारखे रक्त
या माती साठी दिलेल्या मावळयांचा बलिदानाचा.
या माती साठी केलेल्या रक्ताच्या अभिषेकचा……

कधी असा विचार करा कि हे राज्य
माझ्या शिवरायांचे आहे आणि
ते राखण्यासाठी जन्माला आलेला माझ्या शिवरायांचा
मर्द मावळा आहे येतील कितीहि वादळे, मला फरक नाही पडत,
त्या वादळना हि शांत करण्याची शक्ती मला शिवरायांनी दिली,
कारण मी शिवरायांचा मर्द मावळा आहे

शिवरायांच्या कृपेने या मराठी मातीत
जन्माला आलो याचा मला अभिमान नाही तर गर्व
आहे
आणि जगा जय शिवराय बोलून ताठ मानेने
तुम्हाला अडवणारा कधीच कोणी या जगात असणार
नाही.....
– अज्ञात

(माझ्या वाचनात आलेली महाराजांवरची कविता, खरेच अप्रतिम आणि काही गोष्टींचा साक्षात्कार करून देणारी कविता. या कवितेचे कवी कळले तर नाव आदरपुर्वक जाणून घेऊ इच्छितो)

## २. गड किल्ले - एक साम्राज्य

इतिहासात महाराष्ट्र राज्य हे एक महत्वाचे राज्य होते, तेथे असणाऱ्या पर्वत रांगा, नैसर्गिक सुबत्ता आणि सुजलाम वैभव याचा कोणालाही हेवा वाटेल असाच होता आपला महाराष्ट्र, आहे आणि कदाचित यापुढे राहील. महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वत आहे आणि याच परिसरात आपल्याला सर्वाधिक किल्ले पाहायला मिळतात. डोंगर, कडे कपारीमध्ये किल्ला बांधण्याचा मुख्य उद्देश काय असावा ? असा प्रश्न देखील आपल्या समोर येतो. परंतु जिथे राहून शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवता येईल, वेळ प्रसंगी शत्रूवर हल्ला करता येईल आणि नैसर्गिक किंवा बांधकाम करून दुर्गम केलेल्या ठिकाणी राहिल्यामुळे आपले संरक्षणही होईल, अशाच ठिकाणीच किल्ले बांधलेले दिसून येतात. म्हणूनच कदाचित इतिहासात स्वतःचे राज्य शत्रूपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि वेळ प्रसंगी राहण्यासाठी बांधण्यात आलेल्या अशा ठिकाणांना किल्ला असे म्हणतात. तसेच व्यापारी मार्गांवर लक्ष ठेवणे आणि कर गोळा करण्यासाठी या जागांचा उपयोग केला जात असे.

**किल्ल्याचे प्रकार :**

किल्ल्याचे बांधकाम करण्यात आलेल्या स्थानावरून त्याचे प्रकार पडतात. आपल्याला किल्ल्याचे केवळ तीन प्रकार माहिती असतील.

- गिरिदुर्ग म्हणजेच डोंगरी किल्ला,
- जलदुर्ग म्हणजेच समुद्रकिनारी किंवा समुद्रात बेटांवर बांधण्यात आलेला किल्ला आणि
- भुईदुर्ग म्हणजेच सपाट भू-भागावर बांधण्यात आलेला किल्ला.

परंतु या व्यतिरिक्तदेखील किल्ल्यांचे काही प्रकार आहेत, ज्यांची नोंद आपणांस किल्ले  व त्यांचे साहित्य वाचून कळतील

- वनदुर्ग म्हणजे अरण्यात असलेला किल्ला,
- गव्हरं दुर्ग म्हणजेच एखाद्या गुहेचा उपयोग करून त्याचा वापर किल्ल्यासारखा होत असेल तर,
- कर्दमं दुर्ग म्हणजे चिखलात किंवा दलदलीच्या प्रदेशात बांधण्यात आलेला किल्ला,

तसेच केवळ कोट किंवा गढी स्वरूपातील इमारती किल्ल्याप्रमाणेच मानल्या जातात.

**महाराष्ट्रातील किल्ल्यांचा इतिहास:**

महाराष्ट्र हा असा प्रदेश आहे, ज्या ठिकाणी वेगवेगळया प्रदेशातील परकीयांनी राज्य केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बांधण्यात आलेल्या किल्ल्यांवर या परकियांच्या बांधकाम कौशल्याची छाप दिसून येते. महाराष्ट्रात बांधण्यात आलेल्या किल्ल्यांमध्ये **स्वदेशी तसेच प्रादेशिक कला कौशल्याचा सहभाग आपणांस नेहमीच दिसतो..** दोन हजार वर्षांपूर्वीच्या सातवाहन राजवंशापासून ते राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव, कदंब, बहमनी, मोगल, दक्षिणी पातशाह्या, मराठेशाही, पेशवाई, हबशी, पोर्तुगीज, डच आणि इंग्रज अशा वेगवेगळया काळातल्या सत्ताधीशांनी हे किल्ले बांधलेले आहेत.

**किल्ल्याचे भाग :**

किल्ला बांधत असताना किंवा किल्ला बांधणीची जागा हेरत असताना विशेष काळजी घेतली जात असे, त्यानुसार डोंगरी किल्ला बांधलेल्या जागेचे चार भाग पडतात.

- घेरा - किल्ल्याच्या पायथ्याजवळ असलेले गाव,
- मेट- किल्ला,
- माची - किल्ल्यावरील बालेकिल्ल्याखालील तटबंदीयुक्त सपाटी आणि
- बालेकिल्ला - किल्ल्यावरील सर्वात संरक्षित ठिकाण होय

हे किल्ल्याचे मुख्य भाग आहेत.

स्वराज्याची स्थापना करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ४०० गड-किल्ले जिंकले, बांधले. रायगड, प्रतापगड, लोहगड, शिवनेरी, पुरंदर, सिंधुदुर्ग, पन्हाळा, सिंहगड हे गड सर्वांच्या परिचयाचे आहेत. आपण जिल्हावार किल्ले पाहणार आहोत, त्यासाठी एक गड-किल्ले सूची आपणासमोर सादर करीत आहोत. *जिल्ह्याच्या नावापुढील आकडा त्या जिल्ह्याच्या यादीत असलेल्या एकूण किल्ल्यांची संख्या दाखवतो. या किल्ल्यांशिवाय आणखीही काही लहान किल्ले असू शकतात.*

**जिल्हावार किल्ले:**

- **अकोला जिल्हा (२)-** *अकोला किल्ला (असदगड) , नरनाळा किल्ला*
- **अमरावती जिल्हा (१)** - *गवळीगड (गाविलगड)*
- **अहमदनगर जिल्हा (१२)** - *भुईकोट किल्ला, बहादूरगड, रतनगड, खर्ड्याचा किल्ला, हरिश्चंद्रगड, मांजरसुभा किल्ला, पळशीकर गढी / पळशीचा भुईकोट, कोथळ्याचा भैरवगड / कोथळीगड, कुंजरगड / कोंबडा किला, शिरपुंज्याचा भैरवगड, किल्ले पेमगिरी/ शहागड/ भीमगड, बितनगड*
- **उस्मानाबाद जिल्हा (२)** - *नळदुर्ग , परंडा*

- **औरंगाबाद जिल्हा (९)** - *अंतुरचा किल्ला, जंजाळा किल्ला/वैशागड, तलतम गड, देवगिरी (दौलताबाद), भांगशीमाता गड, महादेव टाक किल्ला (लोंझा किल्ला), लहूगड, वेताळगड किल्ला (वाडीचा किल्ला), सुतोंडा*
- **कोल्हापूर जिल्हा (९)-** कलानिधीगड, पन्हाळा, पारगड, पावनगड,बावडा, भूधरगड, रांगणा,विशालगड, सामानगड
- **गोंदिया जिल्हा (१)-** गोंदियाचा प्रतापगड
- **चंद्रपूर जिल्हा (२)** - बल्लारशा, चंद्रपूरचा किल्ला, माणिकगड, भद्रावती किल्ला, लोहगड, चंदनखेडा किल्ला, गोंड राज्याचा किल्ला
- **जळगाव जिल्हा (४) -** अंमळनेरचा किल्ला, कन्हेरगड, पारोळयाचा किल्ला , बहादरपूर किल्ला
- **बीड जिल्हा (२) -** धर्मापुरीचा किल्ला, धारूर किल्ला
- **भंडारा जिल्हा (१)-** अंबागड किल्ला (तुमसर तालुका)

- **ठाणे जिल्हा (३९)** – अर्नाळा, अलिबाग, अशीरगड, असावगड, इंद्रगड, उंबरगांव, कल्याणचा किल्ला, कामनदुर्ग, काळदुर्ग, केळवे-माहीम, कोंजकिल्ला, गंभीरगड, गुमतारा, गोरखगड, घोडबंदर, जीवधन, टकमक, ठाणे किल्ला, डहाणू, तांदूळवाडी किल्ला, तारापूर, धारावी, दातिवरे, दिंडू, नळदुर्ग, पारसिक, बल्लाळगड, बळवंतगड, भवनगड, भैरवगड, भोपटगड, मनोर, माहुली, वरसोवा, वसईचा किल्ला, शिरगांवचा किल्ला, संजान, सिद्धगड, सेगवाह, चंदेरी, बेलापूरचा किल्ला, नवी मुंबई.
- **धुळे जिल्हा (१) -** सोनगीरचा किल्लाभाबेर/लळींग
- **नंदुरबार जिल्हा (१) -** अक्काराणीचा किल्ला (अक्राणीचा किल्ला)
- **नागपूर जिल्हा (६)** - आमनेरचा किल्ला, उमरेडचा किल्ला, गोंड राजाचा किल्ला, **नगरधन** (रामटेक) (वाळके किल्ला), भिवगड, सिताबर्डीचा किल्ला
- **नाशिक जिल्हा (३६) -** अंकाई, अचलगड, अंजनेरी, अलंग, अहिवंत, इंद्राई, कंक्राळा, कंचना, कण्हेरगड, कऱ्हेगड, कावनई, कुलंग, कोळधेर, गाळणा, घारगड किंवा गडगडा, चांदोर, जवळ्या, टंकाई,

त्रिंगलवाडी, त्रिंबक, धैर, धोडप, पट्टा, बहुळा, ब्रह्मगिरी, भास्करगड, मार्किंडा, मुल्हेर, रवळ्या, राजधेर, रामसेज, वाघेरा, वितानगड, हर्षगड, हरगड, हातगड, मालेगाव भुईकोट किल्ला, साल्हेर (बागलाण)

- **पुणे जिल्हा (२२)** – अणघई, कुवारी, घनगड, चाकण, चावंड, जीवधन, तिकोना, तुंग, नारायणगड, नोरगिरी, पुरंदर, प्रचंडगड (तोरणा), मल्हारगड, राजगड, राजमाची, विचित्रगड, विसापूर, लोहगड, शिवनेरी, सिंदोळा, सिंहगड, हडसर, दॉलत मंगळ, केंजळगड, रोहिडा, कोरीगड (कोराईगड)
- **मुंबई शहर, उपनगर (६)** - माहीमचा किल्ला, वरळीचा किल्ला, वांद्रेचा किल्ला, मढ किल्ला, शिवडीचा किल्ला, शीवचा किल्ला
- **रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा (४२)**- अंजनवेल, आंबोळगड-रत्नागिरी, आवर किल्ला, कनकदुर्ग, कुडाळचा किल्ला, कोट कामते, खारेपाटण, गोवळकोट, गोवा, जयगड (रत्नागिरी,दुर्ग रत्नागिरी, देवगड, नांदोशी, निवती, पालगड, पूर्णगड, फत्तेगड, बाणकोट, बांदे, भगवंतगड, भरतगड, भवनगड, भैरवगड, मंडणगड, मनसंतोषगड, मनोहरगड, महादेवगड, महिपतगड, यशवंतगड, रत्नदुर्ग, रसाळगड, राजापूरचा किल्ला, रायगड, विजयगड, विजयदुर्ग, वेताळगड, सर्जेकोट, साठवली, सावंतवाडीचा किल्ला, सिंधुदुर्ग, सुमारगड, सुवर्णदुर्ग

- **रायगड जिल्हा (३२)** –अवचितगड, उंदेरी, कर्नाळा, कुलाबा, कोथळीगड (पेठचा किल्ला,कोरलई, कौला किल्, खांदेरी, घोसाळगड, चंदेरी, तळेगड, तुंगी, ढाक, पदरगड, पेब, प्रबळगड, बिरवाडी, भिवगड, मंगळगड (कांगोरी, मलंगगड, माणिकगड, मानगड, रतनगड, रायगड, लिंगाणा, विशाळगड, विश्रामगड, सांकशी, सागरगड, सुरगड, सोनगिरी, सोनडाई, सुधागड, सरसगड
- **सांगली जिल्हा** (**११**) -तेरदाळ, दोदवाड, प्रचितगड, भूपाळगड/भोपाळगड/बाणूरगड, मंगळवेढे, मच्छिंद्रगड, रामगड, शिरहट्टी, श्रीमंतगड, सांगली, येलवट्टी
- **सातारा जिल्हा (२४)** –अजिंक्यतारा, कमळगड, कल्याणगड (नांदगिरी ,(केंजळगड, चंदनगड, जंगली जयगड, गुणवंतगड, दातेगड/सुंदरगड, नांदगिरी, पांडवगड, प्रतापगड, भैरवगड, भूषणगड, मकरंदगड, महिमंडणगड, महिमानगड, सज्जनगड, संतोषगड, सदाशिवगड, वर्धनगड, वंदनगड, वसंतगड, वारुगड, वैराटगड
- **सोलापूर जिल्हा (२) -**अक्कलकोटचा भुईकोट, सोलापूरचा भुईकोट

- **यादीत समावेश नसलेले किल्ले** – अचला, कांचन, मनमाडजवळचा कात्रा, कोंढवी, कोळदुर्ग, कोळदेहेर, खारेपाटण सिंधुदुर्ग जिल्हा) खैराईगड, मनमाडजवळचा गोरखगड, देहेरगड, आंबोलीजवळचा नारायणगड, जुना पन्हाळा, पालगड, भवानीगड, भास्करगड (नाशिक जिल्हा), कणकवलीजवळचा भैरवगड (सिंधुदुर्ग जिल्हा), कोथळ्याचा भैरवगड, नरडव्याचा भैरवगड, मेसणा, मोरधन, मोहनदर (नाशिक जिल्हा), रांजणगिरी, राजदेहेर, रामदुर्ग, वाघेरा, सदानंदगड (सिंधुदुर्ग जिल्हा), सिद्धगड (सिंधुदुर्ग जिल्हा), कणकवलीचा सोनगड (सिंधुदुर्ग जिल्हा), बांद्याजवळचा हनुमंतगड, उदगीरचा भुईकोट किल्ला, उदगीर. (लातूर जिल्हा).

**टीप:** वरील सादर केलेली यादी ही आम्ही पूर्णपणे पडताळून पाहिलेली नाही यात कदाचित काही गड -किल्ले यांची नोंद नसू शकते. हे सदर प्रामुख्याने लिहिण्याचे कारण यात आम्हाला महाराजांच्या साम्राज्याची जनतेला तोंडओळख करून द्यायची आहे.

आपल्या राजाचे एवढे मोठे कर्तृत्व आहे की त्यांनी बांधलेले गड - किल्ले हे आपल्यासाठी एक ऐतिहासिक वारसा आहे आणि तो आपणच जपला पाहिजे. त्यासाठी तुम्हाला विशेष असे काही करायचे नाही, तुम्हाला या सर्वांची माहिती तुमच्या मुलांना सांगून जमल्यास अशा गड-किल्यांवर एकदा तरी वेळ काढून पाहण्यासाठी गेले

पाहिजे. अशा प्रयत्नांनी ही परंपरा अशीच पुढे चालू राहील यात मला तिळमात्र सुद्धा शंका नाही. महाराजांनी आपला इतिहास ओळखला होता आणि त्यांनी त्याप्रमाणे त्यांचे आयुष्य स्वराज्यासाठी वाहिले, आपण त्यांचे राजकारण न करता एका श्रद्धने त्याचे पालन करावे हीच आपणा सर्वांना आग्रहाची विनंती.

## ३. गड किल्ले : एक ई - परिक्रमा

प्रामुख्याने हा प्रकार वेगळा होऊ शकतो आणि त्याची माहिती सगळयांना मिळावी म्हणून एक छोटासा प्रयत्न. आपण आता एक-एक गड -किल्ला त्याची माहिती आणि त्याची **" इतिहास महाराष्ट्राचा - गड किल्ल्यांचा "** यु-ट्यूब व्हिडिओ लिंक वापरणार आहोत.





## किल्ला क्रमांक - ०१ दुर्गाडी किल्ला कल्याण-ठाणे जिल्हा

कल्याण शहर उल्हास नदी, खाडी किनारी वसलेले आहे. सातवाहनांच्या राजवटीमध्ये कल्याण बंदर खूप प्रसिद्ध होते. मध्यपूर्व देशातील तसेच रोम पर्यंत चालणाऱ्या व्यापाराचे कल्याण हे केंद्र होते. कल्याण बंदरामध्ये येणारा व्यापारी माल येथून नाणेघाटमार्गे जुन्नर तसेच प्रतिष्ठाण (पैठण) या राजधानीकडे रवाना होत असे.

बोर घाटाजवळ उगम पावणारी उल्हास नदी वसईजवळ समुद्राला मिळते. उल्हास नदीला कसारा घाटाजवळ उगम पावणारी भातसाई नदी तसेच माळशेज घाटाकडून वाहत येणारी काळ नदी येवून मिळते. त्यामुळे खाडीला पाणी भरपूर असते. कल्याणसारखे महत्त्वाचे बंदर ताब्यात आल्याबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांनी येथे किल्ला बांधण्याचा आदेश दिला. आबाजी महादेवांना येथे किल्ला बांधण्यासाठी पाया खोदतांना या पायामध्ये अमाप द्रव्य सापडले. दुर्ग बांधत असतानाच द्रव्य मिळावी ही दुर्गादेवीचीच कृपादृष्टी समजून किल्ल्याचे नाव दुर्गाडी ठेवण्यात आले.

दुर्गाडी किल्ल्याच्या आश्रयानेच शिवाजी महाराजांनी आपले आरमार उभारण्यासाठी येथे गोदी निर्माण केली. या गोदीतून लढाऊ जहाजांची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या करीता पोर्तुगीजांचे सहाय्य

घेतले. निर्माण झालेल्या आरमाराने पुढे मुंबईच्या इंग्रजांना, वसईच्या पोर्तुगिजांना तसेच जंजिऱ्याच्या सिद्धीला दहशत बसविली. छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्याच्या आश्रयाने भारतीय आरमाराचा पाया घातला.




चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - ०२ किल्ला हरवला आहे.पारसिक किल्ला,मुंब्रा ठाणे

शिवाजी महाराजांच्या आज्ञेने २४ ऑक्टोबर १६५७ साली दादाजी बापुजी रांझेकरांनी कल्याण जिंकून घेतल्यावर शिवाजी महाराज कल्याणला आले. संपूर्ण खाडीप्रदेश त्यांनी स्वतः पाहिला. पश्चिमेला ठाणे शहर होते, पण ते होते पोर्तुगीजांच्या ताब्यात.

ठाणे बंदरात त्यांच्या वखारी होत्या पण त्यांच्या नजरेतील वखवख महाराजांनी नेमकी जोखली होती. पण त्यांनी व्यापार करावा, इतर उद्योग करू नयेत आणि केलेच तर त्यांना जरब बसावी त्यासाठी स्वराज्याचे आरमार असावे म्हणून त्यांनी ती पूर्व पाहणी केली होती. त्यासाठी वसई पासून कल्याण व तेथून ठाणे बेलापूर पर्यंतच्या संपूर्ण खाडी किनाऱ्याची ईत्यंभूत माहिती हेरांनी महाराजांना पुरविली होती. या गडाचा इतिहास आपण खालील लिंकवर बघू शकता

**यु-ट्युब व्हिडिओ लिंक :**

**https://youtu.be/qUaoJZh_M2A?list=UUmp6OdZuVYikZFnkdAdDo0w**

## किल्ला क्रमांक - ०३ टकमक किल्ला,वसई ठाणे

सई तहसील, ठाणे जिल्हा येथे स्थित आहे. या गावाचे नाव पारंपारिक पद्धतीने तातोबा या ऋषींकडून देण्यात आले आहे. त्यांनी किल्ल्याच्या टेकडीवर आपले निवासस्थान घेतले. गुहेचा तलाव त्यांनी बनवला असे म्हटले जाते आणि मोठ्या तलावातील महादेवाच्या छोट्याशा मंदिराला त्याचे नाव देण्यात आले आहे. स्थानिक परंपरा अशी आहे की हा किल्ला शिवाजी द ग्रेट (१६३०-८०) यांनी बांधला होता.



चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - ०४ केळवे माहीम किल्ला ,पालघर

केळवे किंवा केळवा हे महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील गाव आहे. हे गाव पालघरपासून १२ किमी दक्षिणेस आहे.

येथील पुळण प्रसिद्ध असून तेथे पर्यटकांसाठीच्या सोयी आहेत. इथे असलेल्या केळीच्या बागांमुळे ह्या गावाला केळवे नाव पडले आहे.




चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - ०५ काळदुर्ग-पालघर,ठाणे-जिल्हा

महाराष्ट्र राज्यातील पालघर जिल्ह्यात अनेक डोंगरी किल्ले आहेत. ठाणे व जव्हारच्या सीमेवर असणारे हे डोंगरी किल्ले शहरी भागापासून फारसे लांब नसल्यामुळे मुंबईकरांना हे किल्ले एका दिवसात आरामात पाहता येतात. येथे जंगल खूप असल्याने य़ेथे आदिवासी लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. आजही (२०२० साली) हा सारा परिसर मागासलेल्या अवस्थेत आहे.



चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -०६ आदीवासी समाजात वसलेला गंभीरगड गंभीरगड,डहाणू-ठाणे

ठाणे जिल्हा कोकणामधील सर्वात उत्तरेकडील जिल्हा आहे. निसर्गाची विविध रुपे अंगाखांद्यावर मिरविणारा ठाणे जिल्हा सागराचा दंतूर किनारा आणि घनदाट जंगलांनी वेढलेले डोंगर, दऱ्याखोरी यांनी समृद्ध आहे. या दुर्गम डोंगररांगामध्ये अनेक गिरीदुर्ग ठाण मांडून बसलेले आहेत. याच गिरीदुर्गामध्ये गंभीरगड नावाचा वनदुर्ग मोठ्या दिमाखात उभा आहे.



चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -०७ इतिहासाची साक्ष देणारे मुंबईमधील प्रसिद्ध किल्ले

सतराव्या शतकातील मुंबई सात बेटांमध्ये विभागली होती, या प्रत्येक बेटाला स्वत:चे महत्त्व होते. त्यामुळे प्राचीन व मध्ययुगात माहीम, शिवडी, माझगाव, शीव या ठिकाणी किल्ले बांधण्यात आले होते. त्यांची डागडुजी, पुनर्बांधणी सतत होत असे, मुंबई बेटांना मुख्य भूमीपासून अलग करणारी महिकावती उर्फ माहीमची खाडी अतिशय महत्त्वाची होती. या माहीम खाडीच्या मुखावर बिंबराजांचा किल्ला होता, माहीमचा किल्ला म्हणजे मुंबईचा पूर्व-पश्चिम किनारा जोडणाऱ्या जलमार्गाचा द्वाररक्षकच!



चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक – ०८ इतिहास प्रसिद्ध वसंतगड तळबीडचा किल्ला कराड, सातारा

वसंतगड महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक किल्ला आहे. हा किल्ला पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील उंब्रज आणि कऱ्हाड यांच्या दरम्यान रस्त्याच्या पश्चिमेकडे आहे. वसंतगड आणि तळबीड गाव हे वसंतगड या किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.



## किल्ला क्र - ०९ धर्मवीरगड म्हणजेच पेडगावचा बहादूर गड,अहमदनगर

बहादुर किल्ला ( मराठी: बहादूरगड / पेडगाव चा किल्ला ) एक भुईकोट किल्ला आहे. हा अहमदनगर जिल्ह्यात दौंड जवळ आहे. तो भारतातील महाराष्ट्र राज्यात आहे. हा किल्ला पुण्यापासून सुमारे १०० किलोमीटर (६२ मैल) अंतरावर आहे. जवळचे शहर दौंड आहे. हा किल्ला भिमा नदीच्या उत्तरेकडील दौंड शहराच्या पूर्वेस सुमारे १५ किलोमीटर (९.३ मैल) अंतरावर आहे. पेडगाव या गावात हा किल्ला आहे.



## किल्ला क्रमांक -१० गगनगड -बावडा किल्ला,कोल्हापूर

महाराष्ट्राचे ‘चेरापूंजी’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गगनबावडा गावात गगनगड उभा आहे. दक्षिण कोकणातील बंदरांमध्ये उतरलेला माल कोकणातील कुडाळ, कणकवली, गगनबावडा घाट मार्गे देशावर जात असे. या घाटावर लक्ष ठेवण्यासाठी १२ व्या शतकात हा किल्ला बांधण्यात आला. नाथपंथीय गैबीनाथांचे हे मुळ स्थान, १९ व्या शतकात गगनगिरी महाराजांच्या वास्तव्यामुळे प्रकाश झोतात आले. गगनगिरी महाराजांच्या मठामुळे आजही गडावर लोकांचा राबता आहे.



चित्रावर क्लिक करताच दुर्ग परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - ११ हरिहरगड -नाशिक

हरिहर किल्ला किंवा हर्षगड किल्ला हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. सह्याद्रीच्या रांगांमध्ये हरिहर किल्ला आपले वेगळेपण जपतो. ह्या किल्ल्यावर वेताळ मंदिर आहे. मे महिना असेल तर करवंदांचा रानमेवा हमखास खायला मिळतो. हरिहरचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे तेथे चढायला कातळपायऱ्या आहेत. चढाईनंतर पूर्वेकडे लहानसा तलाव लागतो. काठावर हनुमानचे मंदिर व बाजूला चौथऱ्यावर महादेवाची पिंड व नंदी आहेत. आजूबाजूला ४ ते ५ पाण्याने भरलेल्या कातळटाक्या दिसतात. डावीकडे खाली उतरून तटापर्यंत जाता येते. या किल्ल्याला चौफर बेलाग कातळकडा आहे. पूर्वेला कापड्या डोंगर व ब्रम्हगिरी दिसतात. दक्षिणेकडे वैतरणा खोरे आहे. गिर्यारोहणप्रेमींकरता हा एक पर्याय आहे. इतिहास : हरिहर उर्फ हर्षगड हा प्राचीन काळात बांधलेला असून तो अहमदनगरच्या निजामशहाच्या ताब्यात होता. शहाजीराजांनी १६३६ साली निजामशाहीची पुन:स्थापना करतेवेळी त्र्यंबकगडासोबत हा किल्लासुद्धा जिकला.



चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -१२ कर्नाळा किल्ला ,पनवेल-रायगड

कर्नाळा हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. ह्या किल्ल्यालगतचा परिसर कर्नाळा पक्षी अभयारण्य म्हणून ओळखला जातो रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील हा किल्ला आहे. कर्नाळा किल्ला पनवेलपासून सुमारे १२ कि. मी. अंतरावर आहे.

किल्ल्यावर पन्नास मीटर उंचीचा उत्तुंग कावळकडा आहे. कर्नाळ्याची उंची अडीच हजार फूट आहे. रायगड जिल्ह्यातील माथेरान डोंगररांगेतील कर्नाळा किल्ला ट्रेकर्सच्या दृष्टीने सोपा समजला जातो. किल्ल्यावर जाण्यासाठी तिकीट काढावे लागते.

कर्नाळा त्याच्या उंचावलेल्या अंगठ्यासारख्या आकारामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतो. कर्नाळ्याच्या पायथ्याजवळचे अभयारण्य हे संरक्षित प्रदेश म्हणून राखले गेले आहे. कर्नाळा परिसरातील एक ते दोन दिवसांच्या भटकंतीत त्या परिसरातील इतर सर्व किल्ले फिरून होतात.



चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - १३ कोर्लई किल्ला-अलिबाग, रायगड

कोर्लई किल्ला पाहण्यासाठी आपल्याला कोर्लई गावातून जावे लागते. किल्ल्याच्या पायथ्याशी कोर्लई गाव आहे. आणि शेजारीच कोळीवाडा आहे. कोळीवाडयातूनच आपल्याला किल्ल्याकडे जावे लागते. किल्ल्याचा डोंगर एखादया भूशिरासारखा पाण्यात घुसलेला आहे. तीन बाजूला पाणी आणि दक्षिण बाजूला जमिनीशी सांधलेला हा किल्ला सन १५२१ मध्ये दियोगु लोपिश दि सैकर या पोर्तुगीज सैन्याधिकाऱ्याने बांधल्याचे म्हटले जाते.

मुख्य किल्ला पूर्व-पश्चिम जवळपास शंभर फुट तर दक्षिणोत्तर जवळपास एक हजार फुट विस्तारलेला आहे. किल्ल्याच्या प्रवेशारावर लढल्याशिवाय आत प्रवेश नाही (None Passes me but fights) असा इशारा दगडावर कोरलेला आहे. किल्ल्यास सात दरवाजे आहेत. किल्ल्यात गोडया पाण्याची विहिर मोडकळीस आलेला चर्च तसेच एक मंदिर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी समुद्रास खेटून एक जुने दीपगृह आहे. असा हा ऐतिहासिक

किल्ला बरीच वर्षे पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. सन १७४० च्या आसपास तो मराठयांच्या ताब्यात आला. परंतु १८१८ मध्ये इतर किल्ल्यांप्रमाणेच इंग्रजांच्या ताब्यात गेला.




चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - १४ निजाम फोर्ट अर्थात भुइकोट किल्ला

१५ व्या शतकाच्या शेवटी, इ.स. १४८६ मध्ये तत्कालीन बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले. त्यामधून विभक्त झालेल्या मलिक अहमदशहा बहिरी या निजामशहाने मे, इ.स. १४९० मध्ये सीना नदीकाठी पूर्वीच्या भिंगार शहराजवळ नवीन शहर वसवण्यास सुरुवात केली. याच्या नावावरूनच या शहराला अहमदनगर असे नाव पडले. १४९४ मध्ये शहर रचना पूर्ण होऊन अहमदनगर निजामशहाची राजधानी बनले. या शहराची तुलना त्या काळी कैरो, बगदाद या समृद्ध शहरांशी केली जात असे. अहमदशहा, बुऱ्हाणशहा, सुलताना चांदबिबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही येथे १६३६ पर्यंत टिकली.मोगल बादशहा शाहजहानने इ.स. १६३६ मध्ये अहमदनगर काबीज केले. इ.स. १७५९ साली पेशव्यांनी अहमदनगरवर ताबा मिळवला तर १८१७ रोजी ब्रिटिशांनी अहमदनगरवर विजय मिळवला. शहरात अहमदनगरचा भुइकोट किल्ला, चांदबीबी महल, फरियाबाग,बागरोजा घुमट, अशी अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. या शहराला नगर या नावानेसुद्धा ओळखतात.

अहमदनगर शहराच्या पुर्व दिशेला भुईकोट किल्ला आहे. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाच्या काळात पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ. पी.सी. घोष इत्यादी राष्ट्रीय नेते नगरमधील भुईकोट किल्ल्यात बंदिवासात होते. डिस्कव्हरी ऑफ इंडिया हा प्रसिद्ध ग्रंथ पंडित जवाहरलाल नेहरू यांनी याच किल्ल्यात लिहिला. या ग्रंथाची काही हस्तलिखिते आजही येथे पाहण्यास मिळतात. याच किल्ल्यात डॉ. पी.सी.घोष यांनी हिस्ट्री ऑफ एन्शंट इंडियन सिव्हिलायझेशन हा ग्रंथ शब्दबद्ध केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान व मौलाना आझाद यांनी गुबार - ए - खातिर हे ग्रंथ याच शहरात लिहिले.

हे काही स्वतंत्र सेनानी जे " चले जाव " च्या आंदोलन काळात अहमदनगर भुईकोट किल्ल्यात कैदेत होते, नावे कालावधी

१) सरदार वल्लभ भाई पटेल १० ऑगस्ट १९४२ - १८ एप्रिल १९४५

२) पंडित गोविंद पंत १० ऑगस्ट १९४२ - २८ मार्च १९४५

३) आचार्य नरेंद्र देव १० ऑगस्ट १९४२ - २८ मार्च १९४५

४) आचार्य जे .बी. कृपलानी १० ऑगस्ट १९४२ - 27 मार्च १९४५

५) मौलाना अब्दुल कलाम आझाद १० ऑगस्ट १९४२ - १७ एप्रिल १९४५


६) पंडित जवाहरलाल नेहरू १० ऑगस्ट १९४२ - २८ मार्च १९४५

७) असफ अली १० ऑगस्ट १९४२ - ३ एप्रिल १९४५

८) डॉ.पी सी घोष १० ऑगस्ट १९४२ - २० मे १९४४

९) पंडित हरेकृष्ण मेहताब १० ऑगस्ट १९४२ २९ मार्च १९४५

१०) शंकरराव देव १० ऑगस्ट १९४२ १८ एप्रिल १९४५




चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - १५ कृष्णा नदीच्या खोऱ्यात सातारा जिल्ह्यामध्ये वसलेला पांडवगड

सातारा जिल्ह्यातील वाई तालुका हा कृष्णा नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. कृष्णा नदीच्या उत्तरबाजूस रायरेश्वरापासून निघणारी महादेव रांग आहे. सह्याद्रीच्या या उपरांगेतील एका शृंगावर पांडवगड नावाचा किल्ला बांधलेला आहे. शिलाहार राजा भोज याने सातारा जिल्ह्यात जे काही दुर्ग बांधले त्यांतला पांडवगड हा एक आहे.

साधारणपणे इसवी सन ११७८ ते ११९३ या काळात राजा भोज याने हा किल्ला बांधला असावा. पुढे तो किल्ला आदिल्शाहीत गेला. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७३ मध्ये पुन्हा स्वराज्यात आणला,त्यावेळी गडकरी म्हणून सरनौबत पिलाजी गोळे यांची नियुक्ती छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेली नोंद आढळून येते, १६९९ पर्यंत पिलाजी गोळे यांच्या खास पथककडे हा गड होता आणि १७०१ मध्ये तो मोगलांकडे गेला. मोगलांच्या कडून १७०९ ला पुन्हा स्वराज्यात आला,१७३२ ला आनंदाजी गोळे बाबतीत रसद पुरवलेले एक पत्र आढळून येते, अखेर मेजर थॅचरने १८१८मध्ये तो कंपनी सरकारच्या ताब्यात आणला.

या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची ४१७०फूट आहे. पांडवगडाच्या उत्तर अंगाला असलेल्या भग्न दरवाजाने गडामध्ये प्रवेश होतो. वाटेमध्ये पाण्याची दोन टाकी आहेत. गडामध्ये हनुमंताचे मंदिर आहे. मंदिर बांधलेले नसल्यामुळे मूर्ती उघड्यावर आहे. गडावर गडाची देवी पांडवजाईचे मंदिर आहे. गडाच्या चारही बाजूंना नैसर्गिक कातळकडे असल्यामुळे गडावर फारशी तटबंदी बांधलेली नाही. गडावर घरांची जोती तसेच कोरडी पडलेली पाण्याची टाकी आढळतात. गडावर असलेले पांडजाईचे मूळ मंदिर पडून गेले आहे, मूर्तीची झीज झाली आहे. गडावरून धोम धरणाचा जलाशय दिसतो. जलाशयामागे कमलगड दिसून येतो. त्यामागे महाबळेश्वराचे तसेच पाचगणीचे पठार दिसते. पांडवगडाच्या माथ्यावरून खाली वाई तसेच कृष्णा नदीही दिसते. केंजळगड, मांढरदेव, चंदन वंदन किल्ले तसेच वैराटगड हा प्रदेश दिसतो.



चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - १६ किल्ले रोहिडा-विचित्रगड-बिनीचा किल्ला-भोर-पुणे

सह्याद्रीच्या डोंगररांगेत भोर ते महाबळेश्वर असा एक सुरेख डोंगरमार्ग आहे. या डोंगररांगेत ३ ते ४ किल्ले आहेत. यापैकी एक रोहीड खोऱ्यात वसलेला किल्ला म्हणजेच 'किल्ले रोहिडेश्वर'. रोहीडखोरे हे नीरा नदीच्या खोऱ्याच्या काही भागात वसलेले आहे. या खोऱ्यात ४२ गावे होती. त्यापैकी ४१ गावे सध्याच्या पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात मोडतात. रोहिडेश्वर किल्ला हे रोहीड खोऱ्याचे प्रमुख ठिकाण होते. रोहिडा किल्ला भोरच्या दक्षिणेस सुमारे ६ मैलांवर आहे. रोहिडेश्वर किल्ल्याला विचित्रगड किंवा बिनीचा किल्ला असे देखील संबोधले जाते.

या किल्ल्याची निर्मिती ही यादवकालीन आहे. या किल्ल्यावरील तिसऱ्या दरवाजावर असणाऱ्या शिलालेखावरून मुहम्मद आदिलशाहीने ह्या गडाची दुरुस्ती केली असे अनुमान निघते. इ.स. १६६६ च्या पुरंदरच्या तहानुसार हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला गेला. २४ जून इ.स. १६७० रोजी शिवरायांनी किल्ला

परत घेतला. कान्होजी यांच्याकडे भोरची पूर्ण तर रोहिडा किल्ल्याची निम्मी देशमुखी व जमिनीचे काही तुकडे इनाम होते. रोहिडाचे गडकरी त्यांचेकडून ३० होन घेत होते. शिवरायांच्या अधिकाऱ्यांनी विचारणा केली की ३० च होन का, तर राजं त्यावर म्हंटले की, जेधे आपले चाकर असल्यामुळे पूर्वापार चालत आलेले द्रव्यच घ्यावे. पुढे किल्ला मोगलांनी जिंकला, मात्र भोरच्या पंत सचिवांनी औरंगजेबाशी झुंजून किल्ला स्वराज्यात पुन्हा दाखल केला. संस्थाने विलीन होईपर्यंत राजगड, तोरणा, तुंग आणि तिकोना किल्ल्याप्रमाणे हा किल्लाही भोरकरांकडे होता.




चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -१७ वसईचा किल्ला पालघर- वसई

तीन बाजूंनी समुद्र आणि दलदलीने वेढलेला आणि एका बाजूने वसई गावाकडे उघडणारा अशी किल्ल्याची रचना आहे. किल्ल्याला दोन प्रमुख प्रवेशद्वारे असून एक जमिनीच्या दिशेने (गावाकडे) आणि दुसरे बंदराच्या दिशेने आहे. किल्ल्याच्या चोहीबाजूंनी पूर्वी तट होते आणि तटांची उंची ३० फुटांच्या वर होती.

किल्ल्याला एकूण दहा बुरूज आहेत. नोस्सा सिन्होरा दोरेमेदिया, रैस मागो, सेंट गोंसोले, माद्रद दीय, एलिफांत, सेंट पेद्रू, सेंट पॉल्स, सेंट सेबस्तियन आणि दहावा सेंट सेबस्तियन कावलिरो बुरूज, अशी या बुरुजांची नावे होती. बुरुजांवर तोफा आणि बंदुका ठेवल्या जात. प्रत्येक बुरुजावर आठ सैनिक, त्यांचा एक कप्तान असे पथक तैनात असे. मराठ्यांशी झालेल्या वसईच्या लढाईत सेंट सेबस्तियन बुरूज सुरुंगाने उडवून मराठ्यांच्या फौजा आत शिरल्याचे सांगितले जाते.





चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -१८ कमळगड - वाई-सातारा

कमळगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. याचे नाव काहीजण कमालगड असे उच्चारतात आणि तसेच लिहितात. महाबळेश्वरच्या डोंगररांगांनी अनेक ऐतिहासिक गड अलंकारासारखे धारण केले आहेत. वाई परगण्यातील एक उत्तुंग गिरिदुर्ग आहे, जावळी मोहिमेच्या अगोदर हा गड छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात घेतला, नंतर च्या काळात सतत हा गड पायदळ सेनानी पिलाजी गोळे यांच्याकडे असल्याची नोंद सापडते. छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सुद्धा हा गड स्वराज्यात होता अन किल्लेदार हे पिलाजी गोळे असल्याचे पुरावे सापडतात.

धोम धरणाच्या जलाशयात मागील बाजूने एक डोंगररांग पुढे आलेली दिसते. दोन्ही अंगानी पाण्याचा वेढा असलेल्या या पर्वतराजीत हे एक अनोखे पाषाणपुष्प वर आले आहे. दक्षिणेकडे कृष्णा नदीचे खोरे आणि उत्तरेकडे वाळकी नदीचे खोरे यांच्या मधोमध हा दिमाखदार किल्ला उभा आहे.






चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक -१९ प्रभळगड-मुरंजन,पनवेल-रायगड

प्रबळगढ मुरंजन किल्ला : २३०० फूट उंचीचा प्रबळगढ मुरंजन किल्लागिरिदुर्ग प्रकारातील आहे. रायगड जिल्ह्यातील माथेरान डोंगररांगेतील प्रबळगढ मुरंजन किल्ला ट्रेकर्स च्या दृष्टीने माध्यम समजला जातो. मुंबई-पुणे हमरस्त्यावरून जाताना दिसणारा हा नावाप्रमाणे बलवान एक दुर्ग चटकन आपले लक्ष वेधून घेतो. पूर्वेला उल्हास नदी, पश्चिमेला गडी नदी, दक्षिणेला पाताळगंगा नदी, माणिकगड आणि नैऋत्येला कर्नाळा किल्ला, तसेच जवळच असलेला इर्शाळगड असा चुहूबाजूनी वेढलेला हा किल्ले मुरंजन किल्ला उर्फ प्रबळगढ.



चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - २० ऐतिहासिक पुरंदर किल्ला सासवड-पुणे

पुरंदरचा किल्ला हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील सासवड गावाजवळ असलेला एक किल्ला आहे.

सह्याद्रीच्या पुरंदर किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला आहे हे या किल्ल्याचे सर्वात मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे. दक्षिणोत्तर पसरलेल्या मूळ रांगेतून काही फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा पूर्वेकडे अदमासे २४ किलोमीटर धावून भुलेश्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर आणि वज्रगड वसलेले आहेत. कात्रज घाट किंवा बापदेव घाट किंवा दिवे घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याच्या चौफेर माच्या आहेत. किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला अंदाजे २० मैलांवर तर सासवडच्या नैऋत्येला ६ मैलांवर आहे. गडाच्या पूर्वेला बहुतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमेला डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला १३-१४ मैलांवर सिंहगड आहे. तर पश्चिमेला १९-२० मैलांवर राजगड आहे.

पुरंदर किल्ला तसा विस्ताराने मोठा आहे. किल्ला मजबूत असून बचावाला जागा उत्तम आहे. गडावर मोठी शिबन्दी राहू शकते. दारुगोळा व धान्याचा मोठा साठा करून गड दीर्घकाळ लढवता येऊ शकत असे. एक बाजू सोडली तर गडाच्या इतर सर्व बाजू दुर्गम आहेत. गडावरून सभोवारच्या प्रदेशावर बारीक नजर ठेवता येते.




चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

## किल्ला क्रमांक - २१ सह्याद्रीचा मुकुटमणी हरिश्चंद्रगड, अहमदनगर

हरिश्चंद्रगड म्हणजे नगर जिल्ह्याचे महाबळेश्वर ! ठाणे, पुणे आणि नगर यांच्या सीमेवर माळशेज घाटाच्या डावीकडे उभा असणारा अजस्त्र पर्वत म्हणजे हरिश्चंद्रगड, एखाद्या स्थळाचा अथवा गडाचा किती विविध प्रकारे अभ्यास करता येतो याचा सुरेख नमुना म्हणजे हरिश्चंद्रगड.

या गडाचा इतिहास कुतूहलजनक तर भूगोल हा विस्मयकारक आहे. इतर सर्व किल्ल्यांना मोगल अथवा मराठे यांच्या इतिहासाची पार्श्वभूमी आहेत हरिश्चंद्रगडाला तर दोन चार हजार वर्षांपूर्वीची पौराणिक पार्श्वभूमी लाभली आहे. साडेतीन हजार वर्षांहूनही प्राचीन असलेल्या चहुबाजूंनी नटलेल्या रौद्रभीषण कडेकपारींनी नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या या हरिश्चंद्राचा उल्लेख प्राचीन अग्नीपुराणात व मत्स्यपुराणात आढळतो. १७४७ – ४८ मध्ये हा किल्ला मराठ्यांनी मोगलांकडून घेतला आणि किल्लेदार म्हणून कृष्णाजी शिंदे यांची नियुक्ती केली. टोलारखिंडीच्या वाटेने गडावर आल्यावर आपण रोहीदास शिखरापाशी पोहचतो. येथून तास-दीड तासात आपण तारामती शिखरापाशी पोहचतो. पायथ्याशीच हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर आहे.


गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे



## किल्ला क्रमांक - २२ राजमाची किल्ला (मनरंजन व श्रीवर्धन),लोणावळा-पुणे

सह्याद्रीच्या लोणावळा खंडाळा पासून निघणाऱ्या डोंगररांगेमुळे निर्माण झालेला परिसर 'उल्हास नदीचे खोरे' म्हणून ओळखला जातो. याच परिसरातून उल्हास नदी उगम पावते. याच 'उल्हास नदीच्या खोऱ्याच्या प्रदेशात लोणावळयाच्या वायव्येस १५ किमी अंतरावर राजमाची किल्ला वसलेला आहे. कल्याण - नालासोपारा ही प्राचीन काळातील मोठी व्यापारी बंदरे होती. या बंदरापासून बोरघाट हा पुण्याकडे जाणारा हा पुरातन व्यापारी मार्ग होता. त्यामुळे या मार्गावरूनही मोठ्या प्रमाणात वाहतूक चालत असे. या व्यापारी मार्गाचे नियंत्रण करण्यासाठी शिवाय जकात वसूलीसाठी कोकण आणि घाटाच्या वेशीवर असणाऱ्या किल्ल्यांचा उपयोग केला जात असे. यापैकी सर्वात प्रमुख किल्ला म्हणजे राजमाची. किल्ल्याचा भौगोलिक दृष्ट्या विचार केल्यास आपल्या असे लक्षात येईल की राजमाचीच्या एका बाजूस पवन मावळ प्रांतातील तुंग, तिकोना, लोहगड, विसापूर किल्ले, तर दुसऱ्या बाजूस पेठ, भीमाशंकर, ढाकचा किल्ला, गोरखगड, सिध्दगड, चंदेरी असा सर्व परिसर नजरेत पडतो.

त्यामळे हा किल्ला म्हणजे लष्करी दृष्टया एक प्रमुख ठाणं असले पाहिजे. किल्ल्याला दोन बालेकिल्ले आहेत. हे दोन बालेकिल्ले म्हणजे दोन स्वतंत्र असे किल्लेच होय.



चित्रावर क्लिक करताच परिक्रमेचा व्हिडिओ सुरू होईल

**छत्रपती शिवाजीराजे यांचे कर्तृत्व आणि त्यांनी स्वराज्याच्या साम्राज्यात गड-किल्ले जिंकून / बांधून जे साम्राज्य निर्माण केले ते आपण मनापासून जपले पाहिजेत. आज आम्ही या ई -परिक्रमेसाठी ठराविक गडाची माहिती दिली आहे. आपण सर्वांनी प्रयत्न करून बाकी राहिलेल्या गड किल्ल्यांची माहिती जमा करावी हि विनंती. आपल्या मदतीला आहे – इतिहास महाराष्ट्राचा गड किल्ल्यांचा.**

# ४. महाराजांची शस्त्रे

महाराजांची आठवण म्हणजे त्यांचा वाचलेला इतिहास, महाराजांचे नाव घेतले आठवते त्यांचे कर्तृत्व, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांनी शत्रूला कसे सळो कि पळो करून सोडले होते. आपला राजा, त्यांचा पराक्रम पाहू शकलो



नाही याचा खेद वाटतो पण प्रत्येक गोष्टी आपल्या हातात नसतात त्यापेक्षा ज्या गोष्टी आपल्या हातात आहे त्याचा आनंद घेतला पाहिजे. राजाचा पराक्रम सर्व-जग जाहीर आहे त्याला कोणाच्याही प्रमाणपत्राची गरज नाही आणि नसावी. त्यामुळे अशा पराक्रमी राजाचे कर्तृत्व, त्यांनी वापरलेली शस्त्रे, लढाई साहित्य याची उत्सुकता सर्वांनाच असते. मी एका शिवजयंती कार्यक्रमात छत्रपतींचे शस्त्र साहित्य व साधन सामुग्री पाहिली आणि त्यांची छायाचित्रे काढण्याची संधी मला मिळाली त्यांचा संग्रह आपणासाठी सादर करीत आहे.


जाळीदार मुघल
कट्यार



बिचवा
खंजराली
कुकरी
कोयता


जंबीया


पेशकब्ज


मराठा मुठ
तलवारीच्या
मुठीचे प्रकार
मुघल मुठ
राजपूत मुठ


अंकुश
संगीन
भाल्यांचे प्रकार
तबर



मराठा कट्यार
मराठा कट्यार
सुवर्ण मराठा कट्यार


मराठा सैनिक
कट्यार
जगनाल
कलपा



मराठा
कट्यार
हलदाई


मराठा वक धोप


मराठा धोप


मराठा सैनिक
तलवार


मराठा सैनिक
तलवार


मराठा सैनिक
तलवार




निमचा
जगदापुरी




तलवारींचे
प्रकार



खांडा
तेगा


तेगा
मराठा तेगा
राजपुत तेगा
मुघल तेगा



राजपूत
तलवार


अडकित्ते


राजपूत
तलवार


दमास्कस पोलादाची
राजपूत तलवार


अश्वकुंत
गजकुंत
विटा
पदकुंत


पट्टीसा


गेंड्याच्या चामड्याची ढाल
चामड्याची ढाल


बाण




गुर्ज


कुऱ्हाडींचे प्रकार
कुऱ्हाडींचे प्रकार
एतिहासिक शस्त्रे
कुऱ्हाडींचे प्रकार
१) अंतवक्र कुऱ्हाड:- हया कुऱ्हाडीला हैद्राबादी कुऱ्हाड असे म्हणतात. प्रामुख्याने हया कुऱ्हाडीचा उपयोग बळी देण्यासाठी होत असे.
२) बाह्यवक्र कुऱ्हाड :-हया कुऱ्हाडीला परशु असे म्हणतात.परशुमुळे घाव घालण्याच्या ठिकाणी जास्तीत जास्त आघात होतो.
शोध इतिहासाचा


ROYAL
COLLECTION
TRUST
ROYAL COLLECTION ENTERPRISES
जगदंबा तलवार
तपशील: नाकीत्यास हिरे ६, माणके ४४, पाचा १०
एकुण पराज हिरे १३, पाचा १८, माणके ४६७ मिळून सबंध तलवार.





तसेच म्हैस, गेंड्याची पाठ अन कासवाच्या पाठीपासून तयार केलेली ढालही या प्रदर्शनात पाहायला मिळते. याशिवाय चिलखत, तोफ गोळा आणि वाघनखंही इथे आहेत. याखेरीज इतरही अनेक प्रकारची शस्त्रं आणि हत्यारं इथे मांडण्यात आली आहेत. प्रत्येक शस्त्राची माहिती, ते कशापासून बनवलं, ते केव्हा आणि कोणत्या लढाईत वापरलं, याची इत्यंभूत माहिती इथे मिळत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज म्हटल्यावर आपल्याला त्यांनी मिळवलेलं स्वराज्य आठवतं, मोगलांशी दोन हात करताना त्यांना करावा लागणारा पराक्रमही नजरेसमोर येतो. त्याचवेळी त्यांची तलवारही आठवतेकारण याच तलवारीच्या  जोरावर आणि कमी संख्येने असलेल्या मावळ्यांना घेऊन त्यांनी अनेक लढाया जिंकल्या आहेत. त्यामुळे छत्रपतींचे शस्त्र साहित्य कसे होते याची उत्सुकता सर्वांनाच असते. नांदेड येथील शिवलिंग बादशाह मठाचे मठाधीश सिद्धदयाळ शिवाचार्य यांनी मराठा तलवार आणि छत्रपती शिवाजा महाराज यांनी तयार केलेली तलवार कशी होती याची माहिती दिली होती चला तर मग पाहुयात मराठा तलवार आणि तिची वैशिष्टे.

तलवारीचे प्रकार कर्नाटकी धोप, खंडा (मराठा), राजस्थानी (राजपुती), समशेर (मोगली),गुर्ज,पट्टा, आरमार तलवार, मानकरी तलवार तलवारीच्या मुठीवरूनच तलवारीचे सुमारे ४० उपप्रकार होतात. मुठी तांबे, पोलाद, पितळ, हस्तीदंतापासून तयार केलेल्या असत. यातही किरच, तेग, सिरोही, गद्दारा, कत्ती इ उपप्रकार आहेत. खंडा, मुल्हेरी, फटका हे मराठा तलवारींचे काही प्रकार आहेत. तलवार अनेक भागात विभाजली जाते. नखा, खजाना, ठोला, परज, गांज्या, अग्र असे सुमारे २२ भाग असतात. पाते- तलवारीत पाते हे महत्वाचे असते. पोलाद टोलेडो, चंद्रवट, हत्तीपागी, फारशी, जाव्हारदार प्रकारचे असतात.

तलवार हाताळणे, तलवार पकडणे, तलवार म्यानातून बाहेर काढणे, तलवार फक्त पाहण्यासाठी काढलेली असताना तिला पुन्हा म्यान करताना रक्ताचा मान देणे असे महत्त्वाचे नियम पाळण्यात येत होते. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वत: जातीने या सर्व प्रकारावर नजर ठेऊन असत. प्रत्येक मावळ्याने कशाप्रकारे तलवार चालवली आहे, याची माहिती ते वेळोवेळी घेत असत.


सासवड जवळील सोनोरी गावाचे मल्हार रामराव पानसे यांनी खंडोबाला अर्पण केलेली खंडा तलवार सुमारे ४२ किलोची आहे. अशाप्रकारची भव्य आणि वजनी अशी एकमेव तलवार भारतात आहे. शिवरायांची भवानी तलवार ही स्पॅनिश तोलेदो कंपनी मेड आहे असे सांगण्यात येते. पोर्तुगीज सेनापतीकडून खेमसावंत यांच्याकडे आणि त्यांच्याकडून शिवरायांकडे ही तलवार आली. मुघल सैन्यातील मराठा सरदारही मराठा तलवार वापरत होते. त्यांच्या तलवारी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यातील तलवारीत फरक होता. मुघल मराठा तलवारीची ठेवण वेगळी असायची जेणेकरून लढाईत सैन्य कुणाचे होते हे ओळखता यायचे.


अशा कर्तृत्वान राजाला नमन करण्याची संधी मला या **"गड किल्ले.... साम्राज्य शिवरायांचे!"** या ई-बुक च्या निमित्ताने मिळाली म्हणून मी स्वतः भाग्यवंत समजतो. अशी अनेक पुस्तके लिहिलेली असतील , लिहिली जातीलसुद्धा, परंतु अशा साहित्याचा वापर करून आपल्या पुढच्या पिढीला आपला हा इतिहास माहित असला पाहिजे.


आपणा सर्वांना शेवटी विनंती आहे की आपल्या मुलांना एकदा तरी अशा गड-किल्यावर घेऊन जा, मग पहा कसा काय घडतो आपला मावळा.

धन्यवाद !

# ' ई –साहित्यवर ' दत्तात्रय कृष्णा निकम यांची प्रकाशित झालेली पुस्तके कव्हरवर क्लिक करा व वाचा



दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड अन कुठे शोधिशी काश्मीर?**

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो. याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड अन कुठे शोधिशी काश्मीर?**

**सौंदर्याचे निधान आहे तुझ्या गावच्या वेशीवर!**

आपल्या लेखनाची मेल व फोटो पाठवा.

esahity@gmail.com